MHAH190011632023

## नियमित दिवाणी दावा २४९/२०२३ नि.१०   वरील आदेश

वादी तर्फे प्रस्तूतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दिलेला आहे.

२.   वादीच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे,

सदर दावा वादीने प्रतिवादी विरुध्द वाटप जाहिर ठराव आणि निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. वादीने असे कथन आहे की, दाव्याचे कामकाज चालू असतांना प्रतिवादी नं. ३ राहुल रमेश मेहेर यांनी त्यांचे नावे असलेली दावा मिळकत ० हे ४१ आर ही सुलभा लक्ष्मण खेडकर वय ४० वर्षे धंदा शेती रा ठाकुर निमगाव ता. शेवगाव यांच्या हक्कात दि. २१.०६.२०२३ रोजी खरेदीदस्त नं. २७३७/२०२३ अन्वये १,२०,०००/- मोबदल्यात कायमचे विक्री केलेले आहे. त्यामुळे वादीने अर्जामध्ये कथन केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

३.   सदरील अर्जावर प्रतीवादीचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतीवादीतर्फे सदर अर्जावर मागच्याच बाजूला म्हणणे देण्यात आले. प्रतीवादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीने सदरची मिळकत त्याच्या गरजेपोटी विकली आहे व सदर प्रतिवादीस दावा दाखल झालेची माहिती नव्हती अथवा त्यास कोर्टाचे समन्स नव्हते त्यामुळे सदरील अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४.   दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीचा अर्ज, प्रतीवादीचे म्हणणे व अभिलेखाची पाहणी केली असता असे दिसून येते की, वादी तर्फे प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून तुटक कब्जा मिळणेसाठी, जाहिर ठराव व निरंतराचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सध्या सदरचा दावा हा वाद कैफियत येण्यासाठी प्रलंबित आहे.

६.   तसेच त्या अनुशंगाने अर्जाचे अवलोकन केले असता सदरचा दावा न्यायप्रविष्ठ असताना व दाव्याचे कामकाज चालु असताना दरम्यानच्या काळात प्र.वा नं. ३ यांनी त्यांचे नावावरील मिळकत सुलभा लक्ष्मण खेडकर यांना कायम खरेदीखताने विक्री केलेली आहे व सदरचे हस्तांतरण हे केवळ दाव्यामध्ये जाणीवपुर्वक गुंतागूंत करण्याच्या हेतूने केलेले आहे. त्या अनुशंगाने दाव्याच्या योग्य व न्यायोचित निर्णयाकरीता तसेच दाव्यात गुंतागूंत होवू नये याकरीता सदरील दुरुस्ती आवश्यक आहे. सदरील

दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींच्या बचावावर देखील कोणताही परिणाम होणार नाही. त्यामुळे त्याबाबत वादीवर काही खर्च आकारता येईल व वादीने मागितलेली सदरची दुरुस्ती देखील मंजूर होण्यास प्राप्त आहे.

## **आदेश**

१. अर्ज कॉस्ट रूपये २००/- करून मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदरची दुरुस्ती आजपासून १४ दिवसांच्या आत करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतीवादींना देखील ती पुरवावी.

सही /-

(व्ही.बी.डोंबे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
शेवगाव

दि. ०४/१०/२०२३